# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२५/०६/२०१६.

**१) प्राचीन मुर्तीच्या दगडाच्या मुखवटयाची चोरी :—**

नोव्हेंबर २०१५ पासुन फिर्यादी विनायक नारायनराव देशमुख वय ८५ वर्ष, रा. बस्तरवारी वार्ड पवनी, निवृत्त शिक्षक, यांच्या मालकीचे तहसील कार्यालय पवनी समोरील बाळ समुद्राला लागुन असलेल्या जगन्नाथ स्वामीच्या मंदीरा बाहेर १ प्राचीन मुर्तीचा अंदाजे १ फुट उंचीचा दगडाचा मुखवटा कि. अंदाजे ५,०००/—रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला. असे फिर्यादिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. रहांगडाले पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) सोलर बॅटरीची चोरी. :—**

दिनांक २३/०६/२०१६ चे रात्र दरम्यान वनविभागातर्फे लावण्यात आलेली एक्साईड कंपनीची सोलर बॅटरी कि. ७६००/—रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. असे फिर्यादी सचिन सुर्यभान केकडे वय ४७ वर्ष, रा. केसलवाडा ह.मु. सोनेगाव यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. पठाण पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत इसम जखमी. :—**

दिनांक २४/०६/२०१६ रोजी १२.३० वा. आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३१ बीयु ४८३३ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हयीगयीने व लापरवाहीने चालवुन फिर्यादी मो. गैस अब्दुल कुरेशी वय ४९ वर्ष, रा. सरदार वार्ड तुमसर हे मस्जिदकडे पायी जात असतांना त्यांना धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाला. डॉ. परीक्षण व चौकशी अहवाला वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७, भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक २४/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. करडी, सिहोरा, आंधळगाव, पवनी व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६९ लिटर हातभट्टी दारू कि. ४४००/—रू. व ०७ लिटर ९२०० मि.ली. देशी दारू कि. २२००/—रू. तसेच जुगारातुन कि. ५३/—रू. असा एकुण कि. ६६५३/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.